IIP International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# जात सुधारणा आणि सामाजिक न्याय : इतिहास व वास्तव

**डॉ. प्रमोद कोंडाजी चव्हाण**
इतिहास विभाग, सह -प्राध्यापक
श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्टस अँण्ड
संजीवनी कॉमर्स कॉलेज कोपरगाव

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*जात सुधारणा आणि सामाजिक न्याय*

**ABSTRACT**

भारतीय समाजाची रचना प्राचीन काळापासून जातव्यवस्थेवर आधारलेली होती. ही व्यवस्था सुरुवातीला कर्म, गुण, व्यवसाय व सामाजिक जबाबदाऱ्यांशी यांवर आधारित असलेली वर्णव्यवस्था कालांतराने ती जन्माधारित, विषमता निर्माण करणारी, शोषणात्मक व स्थिर जातव्यवस्थेत बनली. जातव्यवस्थेमुळे सामाजिक असमानता, अस्पृश्यता, शिक्षणावर निर्बंध, मानवी हक्कांचे उल्लंघन आणि सामाजिक अन्याय निर्माण झाला. प्राचीन काळात धर्मग्रंथ व स्मृतीग्रंथांनी जातव्यवस्थेला धार्मिक अधिष्ठान दिले. मध्ययुगात ग्रामकेंद्रित अर्थव्यवस्था, बलुतेदारी व जजमानी पद्धतींमुळे जातीय बंधने अधिक कठोर झाली. आधुनिक काळात ब्रिटिश राजवटीत जातव्यवस्थेचे प्रशासकीय वर्गीकरण झाले, तरी याच काळात पाश्चात्य शिक्षण, विवेकवाद व लोकशाही मूल्यांमुळे जातव्यवस्थेची चिकित्सक तपासणी सुरू झाली.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Chavan, P. K. (2026).** जात सुधारणा आणि सामाजिक न्याय : इतिहास व वास्तव. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 787–791.*

**प्रस्तावना**

भारतीय समाजाची रचना प्राचीन काळापासून जातव्यवस्थेवर आधारलेली होती. ही व्यवस्था सुरुवातीला कर्म, गुण, व्यवसाय व सामाजिक जबाबदाऱ्यांशी यांवर आधारित असलेली वर्णव्यवस्था कालांतराने ती जन्माधारित, विषमता निर्माण करणारी, शोषणात्मक व स्थिर जातव्यवस्थेत बनली. जातव्यवस्थेमुळे सामाजिक असमानता, अस्पृश्यता, शिक्षणावर निर्बंध, मानवी हक्कांचे उल्लंघन आणि सामाजिक अन्याय निर्माण झाला. प्राचीन काळात धर्मग्रंथ व स्मृतीग्रंथांनी जातव्यवस्थेला धार्मिक अधिष्ठान दिले. मध्ययुगात ग्रामकेंद्रित अर्थव्यवस्था, बलुतेदारी व जजमानी पद्धतींमुळे जातीय बंधने अधिक कठोर झाली. आधुनिक काळात ब्रिटिश राजवटीत जातव्यवस्थेचे प्रशासकीय वर्गीकरण झाले, तरी याच काळात पाश्चात्त्य शिक्षण, विवेकवाद व लोकशाही मूल्यांमुळे जातव्यवस्थेची चिकित्सक तपासणी सुरू झाली.

या पार्श्वभूमीवर विविध सामाजिक सुधारणा व परिवर्तनकारी चळवळी उदयास आल्या. भक्ती चळवळीतील संत, आधुनिक समाजसुधारक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली जातीय अन्यायाविरोधात संघटित संघर्ष झाला. संविधानाने समता व सामाजिक न्यायाचे अधिष्ठान दिले असले, तरी आजही जातीय विषमता पूर्णतः नष्ट झालेली नाही. म्हणूनच जातव्यवस्थेचा ऐतिहासिक अभ्यास व जात सुधारणा चळवळींचे विश्लेषण करणे आवश्यक ठरते.

**प्राचीन काळातील जातव्यवस्थेचा ऐतिहासिक पाया -**

ऋग्वेदातील पुरुषसूक्तामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा वर्णांचा उल्लेख आढळतो. या टप्प्यावर वर्णव्यवस्था कर्माधिष्ठित होती. व्यक्तीच्या गुण, कार्य व कर्तव्यांनुसार वर्ण ठरत असे. सामाजिक गतिशीलता होती, म्हणजेच वर्ण बदल शक्य होता. मानवाच्या आदिम समाजात कोणतीही कठोर जातव्यवस्था नव्हती. समाजातील लोक शिकार, शेती, पशुपालन, हस्तकला अशी कामे कौशल्य व गरजेनुसार करत होते. ही केवळ श्रमविभागणी होती, जन्माधारित सामाजिक भेद नव्हते. परंतु पुढील काळात स्मृतीग्रंथ, धर्मशास्त्रे व सामाजिक रूढींमुळे ही व्यवस्था कठोर व जन्माधारित बनली.

उत्तर वैदिक काळात धार्मिक कर्मकांड वाढले, ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व वाढले, यज्ञसंस्था व धार्मिक विधी जटिल बनले, यामुळे वर्णव्यवस्था जन्माधारित होत गेली.[1] शूद्रांना शिक्षण, यज्ञ, धार्मिक अधिकारांपासून वंचित केले गेले. याच टप्प्यावर सामाजिक विषमतेचा पाया मजबूत झाला.

मनुस्मृती व इतर स्मृतिग्रंथांनी वर्णांचे अधिकार व कर्तव्ये निश्चित केली, शूद्र व स्त्रियांचे स्थान खालच्या स्तरावर ठेवले, कठोर सामाजिक नियम घालून दिले. यामुळे जातव्यवस्थेला धार्मिक अधिष्ठान मिळाले आणि ती "दैवी व्यवस्था" म्हणून समाजात रूढ झाली.

कालांतराने वर्णांच्या आत अनेक जाती तयार झाल्या. व्यवसाय वारसा बनला, विवाह, भोजन, स्पर्श यावर निर्बंध आले. यामुळे हजारो जाती निर्माण झाल्या आणि समाज पूर्णतः विभागला गेला.

यातच पुढील काळात काही व्यवसाय म्हणजेच चर्मकार, सफाई, मृतप्राणी हाताळणे इ. "अपवित्र" मानले गेले. हे काम करणाऱ्या समाजघटकांना गावाबाहेर ठेवले गेले तसेच या समाजातील घटकांना सार्वजनिक विहिरी, मंदिरे, शिक्षण नाकारले गेले. आणि भविष्यात हाच घटक पुढे अस्पृश्यता अशी अमानवी प्रथा यातून रूढ होण्यास सुरवात झाली.

**मध्ययुगीन काळातील जातव्यवस्थेचा ऐतिहासिक पाया -**

या काळात राजकीय अस्थिरता, साम्राज्यांचे उदय–पतन, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि धार्मिक संस्थांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर वाढला. या परिस्थितीत मध्ययुगात जातव्यवस्था अधिक कठोर झाली. अस्पृश्यतेची प्रथा वाढली. तथापि, भक्ती चळवळीतील संतांनी जातिभेदाला विरोध केला. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, चोखामेळा, कबीर, रैदास इत्यादी संतांनी समतेचा व मानवतेचा संदेश दिला. तरीही सामाजिक रचनेत फारसा बदल झाला नाही.

मध्ययुगीन भारतात समाजाची मुख्य रचना ग्रामकेंद्रित होती. प्रत्येक गावात जातीनुसार कामांचे विभाजन केले गेले होते. त्या नुसार बलुतेदारी, जजमानी पद्धती अस्तित्वात आल्या होत्या.उच्च जातींना सामाजिक व आर्थिक वर्चस्व निर्माण झाले होते. यामुळे जात ही केवळ सामाजिक ओळख न राहता आर्थिक जगण्याचा आधार बनली. पुढेह पुढे या काळात धर्मशास्त्रांचा प्रभाव मोठ्या प्रमावत वाढलेला दिसून येतो व तो तसाच टिकून राहिलेला दिसून येतो. कर्म, पुनर्जन्म व पाप–पुण्याच्या संकल्पना समाजात वाढलेला दिसतो, त्या नुसार जात ही "पूर्वजन्माचे फळ" म्हणून स्वीकारली जाऊ लागली यामुळे जातीय विषमतेला नैतिक व धार्मिक समर्थन मिळण्यास सुरवात झाली.

भारतावर झालेली परकीय आक्रमण हि इस्लामीकाळ आणि जातव्यवस्था या मध्ये आपल्याल मोठा फरक दिसून येतो. दिल्ली सल्तनत व मुघल काळात या मध्ये इस्लाम धर्मात जात नव्हती, तरीही पण भारतात असलेली हिंदू समाजातील जातव्यवस्था कोणताही धक्का लागलेला नाही. महत्वाचे म्हणजे मुस्लिम शासकांनी प्रशासन व महसूल व्यवस्थेसाठी स्थानिक समाजरचना कायम ठेवली. त्यामुळे जातीय श्रेणी बदलली नाही.

मध्ययुगात भारतात हिंदू धर्मा मध्ये अस्पृश्यतेची प्रथा अधिक तीव्र झाली काही जातींना गावाबाहेर राहणे बंधनकारक होते. मंदिरप्रवेश, सार्वजनिक विहिरी बंद केल्या गेल्या होत्या. सामाजिक संपर्कावर कडक निर्बंध घातला गेलेला दिसून येऊ लागला. भारतात अस्पृश्यता ही सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था बनली.

पुढे या काळात व्यवसाय पूर्णतः जातीनुसार ठरले गेले दिसून येतात, पिढ्यान्पिढ्या तेच काम करण्याची सक्ती वाढत गेलेली दिसून येऊ लागली सामाजिक गतिशीलता जवळजवळ संपुष्टात आलेली होती. यामुळे जातव्यवस्था स्थिर व जड बनली.

हे बघत असताना आपल्याला मध्ययुगीन काळात स्त्रियांचे स्थान या कडे पण लक्षदेवा लागणार आहे स्त्री हि दुहेरी बंधनात होते. स्त्री ही जात व पुरुषसत्ता दोन्हींच्या अधीन होत चाली होती. बालविवाह, सती, विधवांचे दुय्यम स्थान या गोष्टी भारतात हिंदू धर्मात वाढत चाले होते. स्त्री शिक्षण नव्हते असे म्हणणे योग्य ठरणार आहे या गोष्टी भारतात होत्या हे खरे आहे. याचेच फळ म्हणजे भारत भूमीत जातव्यवस्था अधिक मजबूत झाली.

मध्ययुगीन भारतात भक्ती चळवळीने भारतातील जातिभेदावर वैचारिक हल्ला केला होता. या वेळी भारतातील अनेक भागात संतांनी धर्म निरपेक्षता, ईश्वर एक आहे सर्व समाज एकच आहे, तसेच समता व मानवतेचा संदेश दिला. संत कबीर, रैदास, नामदेव, तुकाराम, चोखामेळा यांनी जातिभेद नाकारला. मात्र हा विरोध आध्यात्मिक स्तरावर मर्यादित राहिला. याचा परिणाम असा झाला की सामाजिक रचनेत मोठा प्रमाणात बदल झालेला दिसत नाही.

मध्ययुगीन काळातच वाढत चालेली जमीनदार, वतनदार, इनामदार यांची व्यवस्था भारतात खालच्या जातींच्या श्रमांवर आधारलेली होती. कर, वेठबिगारी, बंधनात्मक सेवा या क्षेत्रात शोषण मोठ्या प्रमाणात वाढले होते.[2] त्यातच जात ही शोषण टिकवण्याचे प्रभावी साधन ठरली.

**आधुनिक काळातील जातव्यवस्थेचा ऐतिहासिक पाया -**

ब्रिटिश राजवटीत पाश्चात्त्य शिक्षण, मुद्रणकला व आधुनिक विचारांचा प्रभाव वाढला. सामाजिक अन्यायाची जाणीव तीव्र झाली. जात सुधारणा व सामाजिक समतेसाठी संघटित प्रयत्न सुरू झाले. हा काळ सामाजिक, राजकीय व बौद्धिक परिवर्तनांचा काळ होता. याच काळात जातव्यवस्थेची पुनर्रचना झाली.

भारतावर परकीयांनी केलेल्या सत्ताविस्तार या मध्ये ब्रिटिश राजवट महत्वाची मानली गेली ब्रिटीशानी भारतावर आपली सत्ता प्रस्तापित केली त्यांनी येथील जनतेत महसुली राज केले असे म्हणावे लागणार आहे. त्यांनी भारतात जातव्यवस्थेचे नोंदणीकरण केले. यातूनच भारतातील प्रत्येक व्यक्तीची जात कायमस्वरूपाची ओळख बनली यातून भविष्यात सामाज्याची असणारी ठेवण अधिक कठोर बनली. स्वताच्या फायद्यासाठी ब्रिटिशांनी प्रशासन टिकवण्या साठी जातींना स्थिर श्रेणी निर्माण करून दिली.

इंग्रजीचे पाश्चात्त्य शिक्षण आणि नवविचार या गोष्टी मुळे स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचे विचार भारतात निर्माण होण्यास सुरवात झाली. मानवाधिकार व विवेकवाद रुजन्यास एक जागा निर्माण झाली. जातव्यवस्थेची चिकित्सक तपासणी सुरू केली गेली. यातून सामाजिक सुधारणांचा पाया घातला गेला.

मुद्रणकला व समाजातील मत मतांतर यांचा प्रवाह तो वृत्तपत्रे, ग्रंथ, पत्रके यातून प्रसिद्ध होण्यास सुरवात झाली. जातिभेदाविरोधी अनेक विचार भारतीय समाजकंठकाकडून पुढे येऊ लागले. वंचित समाजाचा आवाज सार्वजनिक होण्यास सुरवात झाली. ही आधुनिक काळातील सामाजिक जागृतीची महत्त्वाची साधने ठरली.

भारतीय समाज सुधारण्यासाठी सुधारकांची भूमिका पुढे येऊ लागली त्यात महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, राजा राममोहन रॉय, महादेव गोविंद रानडे, इ. सुधारकांच्या विचारातून जातिव्यवस्थेवर थेट टीका होण्यास सुरवात झाली. या नेत्यांनी शिक्षण, स्त्रीमुक्ती व समतेवर मोठ्या प्रमाणात लक्ष केंद्रती करून घेतले. देशात समाज सुधारण्याच्या नावाने अनेक संघटना पुढे आल्या व या संघटनांच्या माध्यमातून चळवळी उभारल्या गेल्या जातव्यवस्था ही "दैवी नसून मानवनिर्मित" आहे,[3] हा विचार समोर येण्यास सुरवात झाली.

भारतात याच वेळी एक महान व्यक्ति महत्व समोर आले ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील जाती सुधारणे साठी एक ऐतिहासिक योगदान दिले आहे. त्यांनी जातव्यवस्थेचे शास्त्रीय विश्लेषण करून अस्पृश्यतेविरोधात आंदोलन सुरु केले. संविधानाद्वारे सामाजिक न्यायाचे कायदेशीर अधिष्ठान निमार्ण करून दिले. त्यांनी जातव्यवस्थेला केवळ सामाजिक नव्हे तर राजकीय समस्या म्हणून मांडलेले दिसून येते.

डॉ. आंबेडकर यांनी कायदे व घटनाात्मक सुधारणा यांच्या माधमातून आधुनिक काळात अस्पृश्यता कायद्याने गुन्हा ठरवली तसेच सर्व समाजातील घटकांना मूलभूत हक्कांची हमी दिली. भविष्यात मागास समाजाला आरक्षण व्यवस्था लागू केली. यामुळे जातव्यवस्थेला घटनात्मक आव्हान मिळून देण्याचे योगदान दिले.

ब्रिटीश शासनाच्या काळा पासून तसेच त्यांनी केलेल्या अनेक आर्थिक बदल आणि शहरीकरण तसेच औद्योगिकीकरण

या मुळे ग्रामीण जातीय बंधने काही प्रमाणात ढिली झाली. शहरांत नव्या संधी निर्माण होण्यास सुरवात झाली परंतु आर्थिक विषमता यात कोणताही बदल झालेला दिसला नाही. जात ही सामाजिक ओळख म्हणून तसीच टिकून राहिली.

आधुनिक लोकशाहीत राजकारण आणि जात यातूनच पुढेह जात ही राजकीय संघटनाचे साधन बनत गेले. जातआधारित राजकारण उदयास येण्यास सुरवात झाली. सत्तेसाठी जातीय एकत्रीकरण निर्माण होण्यास सुरवात झाली. जातव्यवस्थेचा नवा राजकीय पाया तयार झाला. आणि भारत एक जात, धर्म, यात गुरफटला जाऊ लागला. पण तो जो श्वास घेत होता तो मोकळा होता.

**परिवर्तनकारी चळवळी आणि जात सुधारणा**

भारता मध्ये अनेक विचारांची लोक एकत्र येऊन त्यांच्या सामाजिक विचारधारा समजासाठी उपयुक्त बनली त्यात ब्राह्मो समाज या मध्ये राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजाने जातिभेद, अंधश्रद्धा व सामाजिक रूढींवर प्रहार केला. समता, विवेक व मानवतावाद यांचा पुरस्कार करण्यात आला. प्रार्थना समाज माधमातून महादेव गोविंद रानडे, आत्माराम पांडुरंग यांनी प्रार्थना समाजाच्या माध्यमातून जातिभेद, अस्पृश्यता व सामाजिक विषमतेविरोधात भूमिका घेतली. महात्मा जोतिराव फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या माध्यमातून त्यांनी शूद्र-अतिशूद्रांच्या शोषणाविरोधात संघर्ष केला. जातिव्यवस्थेवर कठोर टीका करून शिक्षण, स्त्री-मुक्ती व सामाजिक समतेवर भर दिला. स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाच्या माध्यमातून वेदांवर आधारित समतेचा विचार मांडला व जन्माधारित जातिभेदाला विरोध केला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जात सुधारणा व सामाजिक परिवर्तनाचे अग्रणी विचारवंत होते. त्यांनी अस्पृश्यतेविरोधात आंदोलन केले, महाड सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन यांसारख्या चळवळींचे नेतृत्व केले.[4] संविधान निर्मितीद्वारे सामाजिक न्याय, समता व बंधुता या मूल्यांना कायदेशीर अधिष्ठान दिले. स्वातंत्र्योत्तर काळात दलित चळवळीने जातिव्यवस्थेविरोधात संघटित संघर्ष केला. शिक्षण, राजकीय प्रतिनिधित्व व आरक्षण यांद्वारे सामाजिक समतेचा आग्रह धरला. मागासवर्गीय व आदिवासी समाजानेही आपल्या हक्कांसाठी चळवळी उभारल्या. सामाजिक व आर्थिक न्यायाची मागणी केली.

**भरतील जात सुधारणा -**

भारतामध्ये स्वातंत्र्य नंतर जात सुधारणा होण्यास सुरवात झाली यात जन्माधारित जातिभेद निर्मूलन करण्यात आले. अस्पृश्यतेचा अंत केला गेला, सामाजिक समता व न्याय प्रस्थापित करण्याचे काम झाले. शिक्षण व समाजघटकाला संधींमध्ये समानता निर्माण होण्यास सुरवात झाली. त्यानुसार मानवी हक्कांचे संरक्षण करण्यात आले होते.

भारताच्या विकासासाठी अस्पृश्यता कायदेशीररित्या गुन्हा ठरवला जाऊ लागला हळूहळू प्रगतीच्या दिशेने शिक्षण व नोकरीत आरक्षणाची अंमलबजावणीला सुरवात झाली यातूनच सामाजिक जाणीव व लोकशाही मूल्यांची वाढ झाली दिसून येते. या सर्व गोष्टी होत असतांना कोठे तरी मर्यादा पण निर्माण होत होत्या जातीय मानसिकता अजूनही अस्तित्वात जनतेच्या मनातून गेलेली नव्हती. महत्वाचा गाभा म्हणजे सामाजिक व आर्थिक विषमता अजूनही पूर्णतः संपलेली दिसत नाही.[5] या उपर भारतात आज पण ग्रामीण भागात जातिभेद अधिक तीव्र निर्माण झालेला दिसून येतो.

**निष्कर्ष -**

भारतीय समाजातील जातव्यवस्था ही केवळ सामाजिक रचना नसून ती ऐतिहासिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय प्रक्रियांतून घडत गेलेली एक जटिल व्यवस्था आहे. प्रारंभी कर्माधारित असलेली वर्णव्यवस्था कालांतराने जन्माधारित, स्थिर आणि शोषणात्मक बनली. प्राचीन काळात धर्मग्रंथांनी तिला धार्मिक अधिष्ठान दिले, मध्ययुगात ग्रामकेंद्रित अर्थव्यवस्था, बलुतेदारी, वेठबिगारी व धर्मशास्त्रीय प्रभावामुळे ती अधिक कठोर झाली, तर आधुनिक काळात ब्रिटिश सत्तेने तिचे वर्गीकरण करून तिला प्रशासकीय स्वरूप दिले.

या संपूर्ण कालखंडात जातव्यवस्थेमुळे सामाजिक विषमता, अस्पृश्यता, मानवी हक्कांचे उल्लंघन आणि आर्थिक शोषण वाढले. तथापि, या अन्यायकारक व्यवस्थेविरोधात विविध सामाजिक सुधारणा व परिवर्तनकारी चळवळी उदयास आल्या. भक्ती चळवळीने समता व मानवतेचा संदेश दिला, संत चळवळींपासून ते आधुनिक दलित चळवळींपर्यंत जात सुधारणेचा संघर्ष अखंड सुरू आहे. भारतीय संविधानाने सामाजिक न्यायाचे मूल्य अधोरेखित केले असले तरी प्रत्यक्ष सामाजिक परिवर्तनासाठी सतत प्रयत्नांची गरज आहे. समाजसुधारकांनी शिक्षण, स्त्रीमुक्ती आणि विवेकवादाचा पुरस्कार केला; तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातव्यवस्थेचे शास्त्रीय विश्लेषण करून तिला सामाजिक, राजकीय व कायदेशीर पातळीवर थेट आव्हान दिले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्याय यांना कायदेशीर अधिष्ठान दिले. अस्पृश्यता कायद्याने गुन्हा ठरवली गेली आणि आरक्षणासारख्या उपाययोजनांद्वारे वंचित घटकांना संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न झाला. तरीही जातीय मानसिकता, सामाजिक-आर्थिक विषमता आणि ग्रामीण भागातील जातिभेद आजही पूर्णतः नष्ट झालेले नाहीत.

म्हणूनच, जात सुधारणा ही केवळ कायदेशीर किंवा प्रशासकीय प्रक्रिया नसून ती सामाजिक जाणीव, शैक्षणिक परिवर्तन, आर्थिक समता आणि मानवी मूल्यांच्या जोपासनेशी निगडित आहे. भारतीय समाजाचा खरा विकास साधायचा असेल तर जातीय भेदांच्या पलीकडे जाऊन समताधिष्ठित, मानवतावादी आणि लोकशाही मूल्यांवर आधारित समाजरचना घडवणे ही काळाची गरज आहे. जात सुधारणा ही केवळ ऐतिहासिक प्रक्रिया नसून ती आजही समाजपरिवर्तनाची जिवंत चळवळ आहे.

**संदर्भ**

1. जातिव्यवस्था आणि भारतीय समाज , शंकर गोविंद केतकर, कॉण्टिनेंटल प्रकाशन, पुणे – 1909, पृ. 73
2. गुलामगिरी, महात्मा जोतिराव फुले, प्रथम प्रकाशन पुणे, 1873, - पृ. 120
3. वैदिक संस्कृतीचा विकास, तर्कतीर्थ लाक्ष्मनाशाश्त्री जोशी, प्रज्ञापाठशाळा मंडळ,वाई. 1972, पृ. 311
4. जातिव्यवस्थेचा उच्छेद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वप्रकाशित लाहोर- 1936, पृ.195
5. भारतातील विविध सामाजिक चळवळी यांचा सामाजिक शास्त्रीय अभ्यास, ग. प. जोशी, रावत प्रकाशन, पुणे. 2022, पृ.254